संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
अंतर्गत

# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना
(2019-20)

## विशेष शिबिर

**दत्तक ग्राम - सुकळी (रसुलापूर)**
जि.अमरावती
**दि. ४ जानेवारी २०२० ते ११ जानेवारी २०२०**

## निबंधात्मक अहवाल
**(फोटोसह)**


कार्यक्रम अधिकारी
**प्रा. डॉ. डी. एस. नामुर्ते**

प्राचार्य
**डॉ. स्मिता देशमुख**

# Sant Gadge Baba Amravati University, Amravati
## Shri Shivaji Art & Commerce College, Amravati
### N.S.S. Camp At Sukali (Rasulapur) Dist. Amravati STUDENT LIST 2019-2020

| Sr. No. | Volunteers Names | Class | Category |
|---|---|---|---|
| 1 | Pooja Ramesh Dhandar | B.A. I | OBC |
| 2 | Rani Sudam Jadhav | B.A. I | VJNT |
| 3 | Vaishani Subhash Markam | B.A. I | ST |
| 4 | Vaishani Shrikrushna Bhatkulkar | B.A. I | OBC |
| 5 | Mayuri Gajanan Kevatkar | B.A. I | OBC |
| 6 | Pratiksha Shrikrushna Bhende | B.A. I | OBC |
| 7 | Pallavai Dilip Gadhave | B.A. I | OBC |
| 8 | Vrushali Santosh Kharade | B.A. I | OBC |
| 9 | Sneha Shriram Rathod | B.A. I | NT |
| 10 | Pratiksha Bhimrao Manohare | B.A. I | SC |
| 11 | Divya Sanjay Thorat | B.A. I | SC |
| 12 | Sakshi Sunil Sakharkar | B.A. I | OBC |
| 13 | Arpita Sunil Bhokse | B.A. I | OBC |
| 14 | Nisha Ramesh Khandekar | B.A. I | SC |
| 15 | Rina Gopal Nandane | B.A. I | NT |
| 16 | Nikita Subhash Mahalle | B.A. I | OBC |
| 17 | Snehal Radhesham Khasbage | B.A. I | OBC |
| 18 | Pratiksha Rajendra Sarode | B.A. I | NT |
| 19 | Tejswini Padmakar Wakode | B.A. I | SC |
| 20 | Janhavi Rajendra Raut | B.A. I | OBC |
| 21 | Aarti Raju Rathod | B.A. I | ST |
| 22 | Monu Raju Raut | B.A. I | OBC |
| 23 | Samiksha Anil Kakde | B.A. I | OBC |
| 24 | Mayuri Krushnarao Avghad | B.A. I | NT |
| 25 | Pranali Bhanudas Wakpanjar | B.A. I | SC |
| 26 | Pranali Manohar Gharde | B.A. I | SC |

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | Gauri Yadav Mankar | B.A. I | OBC |
| 28 | Sneha Maroti Bhalekar | B.A. I | SC |
| 29 | Aarti Laxmanrao Shinde | B.A. II | OBC |
| 30 | Divya Sureshrao Chaudhari | B.A. II | OBC |
| 31 | Vaishnavi Ravindra Lokhande | B.A. II | SBC |
| 32 | Pranjali Dharamdas Agham | B.A. II | SC |
| 33 | Sakshi Vinayak Dongare | B.A. II | SC |
| 34 | Saloni Santosh Meshram | B.A. II | SC |
| 35 | Aarti Sudhir Tidke | B.A. II | SC |
| 36 | Ashwini Ramesh Khandekar | B.A. II | SC |
| 37 | Diksha Sanjayrao Gadling | B.A. II | SC |
| 38 | Chaitali Rameshwar Deshmukh | B.A. II | SBC |
| 39 | Nikita Ganesh Pandit | B.A. II | NT |
| 40 | Payal Vinod Lonare | B.Com. I | SC |
| 41 | Sakshi Sanjay Kore | B.Com. I | OBC |
| 42 | Monali Sahebrao Meshram | B.Com. II | SC |
| 43 | Vaishnavi Rameshwar More | B.Com. II | OBC |
| 44 | Shivani Naresh Kokate | B.Com. II | OBC |
| 45 | Dhanashri Pramod Petale | B.Com. II | OBC |
| 46 | Mrunal Vilesh Bhoyar | B.Com. II | OBC |
| 47 | Mayuri Ashok Thakre | B.Com. II | OBC |
| 48 | Anjali Ramesh Lavhade | B.Com. II | OBC |
| 49 | Dipali Vaman Shejav | B.Com. II | SC |
| 50 | Gayatri Dinkar Nimbhorkar | B.Com. II | OBC |
| 51 | Samiksha Narendra Nirmal | B.Com. II | OBC |
| 52 | Vishal Rajaram Pawar | B.A I | NT-B |
| 53 | Abhay Sureshrao Bhoyar | B.A I | OBC |
| 54 | Sanket Panditrao Uprikar | B.A I | OBC |
| 55 | Sumit Bhaskar Ridhhe | B.A I | OBC |
| 56 | Moreshwar Digambar Mahalle | B.A I | OBC |
| 57 | Akshay Bhaosing Mohite | B.A I | NT |

| | | | |
|---|---|---|---|
| 58 | Harshal Dhanraj Bhoyar | B.A I | OBC |
| 59 | Raju Namdev Bhoge | B.A I | ST |
| 60 | Kushal Arvind Varghat | B.A I | SC |
| 61 | Nitin Ashokrao Dukare | B.A I | OBC |
| 62 | Himanshu Gajanan Wankhade | B.A I | Open |
| 63 | Saurabh Mahendra Meshram | B.A I | SC |
| 64 | Shubham Rushidas Uke | B.A I | SC |
| 65 | Kamlesh Kashinath Chavan | B.A I | ST |
| 66 | Jaykumar Laxman Padghan | B.A I | SC |
| 67 | Satish Panjabrao Raybole | B.A I | SC |
| 68 | Nitin Arvind Thakre | B.A I | OBC |
| 69 | Tejas Vishnu Fulke | B.A I | SC |
| 70 | Ritesh Bansi Nagdevte | B.A II | SC |
| 71 | Vaibhav Kashinath Ingle | B.A II | SC |
| 72 | Umesh Bhaiyalal Patolkar | B.A II | ST |
| 73 | Kasim Kayum Shiekh | B.A II | Open |
| 74 | Pranay Gajanan Dharmale | B.A II | OBC |
| 75 | Pravin Shamlal Kasdekar | B.A II | ST |
| 76 | Parag Sunil Raut | B.A II | OBC |
| 77 | Vishal Santosh Londe | B.A II | SC |
| 78 | Rushikesh Dipakrao Nimkar | B.A II | OBC |
| 79 | Shashank Madan Bhagat | B.A II | SC |
| 80 | Shivanand Ramkishan Mavaskar | B.A II | ST |
| 81 | Abhay Narayanrao Parode | B.A II | OBC |
| 82 | Amar Anil Katore | B.A II | OBC |
| 83 | Rajat Pramodrao Hivarkar | B.A II | OBC |
| 84 | Atul Sonule | B.A II | SC |
| 85 | Vikki Prakash Wankhade | B.A II | OBC |
| 86 | Shailesh Manohar Uike | B.A II | ST |
| 87 | Anup Balasaheb Chandane | B.A III | SC |
| 88 | Akash Gautam Khandare | B.A III | SC |

| | | | |
|---|---|---|---|
| 89 | Akash Baban Wankhade | B.A III | SC |
| 90 | Sumedh Ravidnra Nannavare | B.A III | SC |
| 91 | Harshal Shankar Chavan | B.A III | VJNT |
| 92 | Akash Dattatray Mehatre | B.A III | OBC |
| 93 | Chaitanya Kailashrao Savarkar | B.Com. I | OBC |
| 94 | Tejas Vinod Sagane | B.Com. I | SC |
| 95 | Shivam Bhagvan Rudravar | B.Com. II | SBC |
| 96 | Shivraj Subhashrao Dhok | B.Com. II | OBC |
| 97 | Suraj Subhashrao Rupnarayan | B.Com. II | SC |
| 98 | Govardha Khushal Aade | B.Com. II | NT |
| 99 | Pratik Shivchandra Jadhav | B.Com. II | NT |
| 100 | Darshan Ajendra Vathodkar | B.Com. II | OBC |

| Group | OPEN | OBC | SC | VJ-NT | ST | SBC | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Male | 02 | 20 | 15 | 05 | 06 | 01 | 49 |
| Female | - | 25 | 16 | 06 | 02 | 02 | 51 |
| Total | 02 | 45 | 31 | 11 | 08 | 03 | 100 |

N.S.S. P.O.

राष्ट्रीय सेवा योजना
कार्यक्रम अधिकारी
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय
अमरावती

PRINCIPAL

Principal
Shri Shivaji Arts and Commerce
College, Amravati

## शनिवार दि. ११/०१/२०२०

| | |
|---|---|
| सकाळी ६.०० : | प्रार्थना व योगासने    सकाळी ८.३० ते १०. परिसर व ग्रामस्वच्छता |
| दुपारी १२.वा. : | **समारोपीय कार्यक्रम** |
| अध्यक्ष : | मा. डॉ. स्मिता देशमुख (प्राचार्य, श्री. शिवाजी कला व वाणिज्य महा. अम.) |
| प्रमुख उपस्थिती | डॉ. रमेश अंधारे (माजी प्राचार्य, श्री. शिवाजी कला व वाणिज्य महा. अम.) |
| | मा. डॉ. सुभाष गावंडे (अधिसभा सदस्य,सं.गा.बा.अ.वि. अमरावती) |
| प्रमुख उपस्थिती | सौ. जयश्री प्रमोद निर्मळ, (सरपंच) |
| | श्री. प्रमोद पाथरे (पोलीस पाटील) |
| | सौ. प्रतिभा यावले (मुख्याध्यापक) |
| | श्री. मनोज देशमुख, (ग्रामसेवक) |
| | जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षकवृंद |

## रा.से.यो. शिबिरातील दैनंदिनी

| | | | |
|---|---|---|---|
| सकाळी ६.०० वा. | प्रार्थना व योगासने | दुपारी ३ ते ५.३० | बौध्दीक सत्र |
| सकाळी ७.३० वा. | चहा व अल्पोपहार | रात्री ६ ते ७ | प्रार्थना व स्फूर्तीगीत, |
| सकाळी ८.३० ते १२ | श्रमदान /प्रकल्प कार्य | रात्री ७ ते ८ | भोजन |
| दुपारी १२.३० ते२.३० | वैयक्तीक स्वच्छता व भोजन | रात्री ८ ते १० | सांस्कृतिक कार्यक्रम |

## शिबिरादरम्यान राबविण्यात येणारे उपक्रम

* श्रमदान * स्वच्छ भारत अभियान * अंधश्रध्दा निर्मूलन व जनजागृती * पर्यावरण जनजागृती
* आरोग्य शिबिर * महिला सक्षमीकरण * व्यक्तीमत्व विकास * ग्रामस्वच्छता अभियान

## सदिच्छा भेटी

मा.डॉ. मुरलीधर चांदेकर (कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती)
मा. श्री. हर्षवर्धनजी देशमुख (अध्यक्ष,श्री.शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती)
मा. डॉ. राजेश जयपुरकर (प्र. कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती)
मा. डॉ. तुषार देशमुख (कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती)
मा. श्री.दिलीपबाबू इंगोले (कोषाध्यक्ष,श्री.शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती)
मा. प्राचार्य केशवराव गावंडे (अध्यक्ष,रा.से.यो.समिती तथा कार्यकारणी सदस्य श्री.शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती)
मा. श्री. अतुल साळुंखे ( SLO महाराष्ट्र शासन राष्ट्रीय सेवा योजना )
डॉ. राजेश बुरंगे (प्र. संचालक,रा.से.यो. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती)
मा. डॉ. मंदा नांदुरकर – (रा.से.यो. जिल्हा समन्वयक)
तथा रा.से.यो. सल्लागार समिती तसेच विद्यापीठ व संस्थेचे सर्व सन्माननिय अधिकारी व पदाधिकारी गण

प्रती,
श्री/श्रीमती ____________________
____________________
____________________

**प्रेषक**
**मा. डॉ. स्मिता रा. देशमुख**
प्राचार्य, श्री. शिवाजी कला व वाणिज्य महा. अमरावती

# निमंत्रण पत्रिका





**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती अंतर्गत**
श्री. शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती व्दारा संचालित
**श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,अमरावती**

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर

आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर शनिवार दिनांक ०४/०१/२०२० ते शनिवार ११/०१/२०२० या कालावधीत दत्तकग्राम सुकळी,रसुलापुर जि. अमरावती येथे संपन्न होत आहे. या शिबिरामधील विविध कार्यक्रमास आपण सन्मानपुर्वक निमंत्रीत आहात कृपया आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

**आपले विनीत**

प्राचार्य, डॉ. स्मिता रा. देशमुख

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. डि. एस. नामूर्ते (कार्यक्रम अधिकारी) मो.नं. ८६९८५२५७२६ | डॉ. सुवर्णा गाडगे (महिला कार्यक्रम अधिकारी) |
| | डॉ. मनोज जगताप (रा. से.यो. सल्लागार समिती) |
| प्रा. डॉ. जयराम गायकवाड(रा.से.यो.सल्लागार समिती) | शशांक भगत (विद्यार्थी प्रतिनीधी) |
| सौ. जयश्री प्रमोद निर्मळ (सरपंच) | कु. जान्हवी राऊत (विद्यार्थीनी प्रतिनीधी) |
| श्री. प्रमोद पाथरे (पोलीस पाटील) | **विशेष सहाय्य** |
| श्री. मनोज देशमुख (ग्रामसेवक) | श्री. संजय पाटिल (तंटा मुक्ती अध्यक्ष) |
| श्री. गजानन कुरवाडे (ग्रा.पं. सदस्य) | श्री. संदिप पाथरे |
| श्री. दिनेश बसरे (ग्रा.पं. सदस्य) | श्री. संजय जवळकार |
| सौ. सुरेखा बाहेकार (ग्रा.पं. सदस्य) | श्री. शांताराम खांडेकर |
| सौ. नंदा गोपीचंद लोणारे (ग्रा.पं. सदस्य) | श्री. रमेश गुडधे |
| श्री. रविंद्र साठे (ग्रा.पं. सदस्य) | श्री. सुनिल कापसे |
| सौ. राजकन्या खोब्रागडे (ग्रा.पं. सदस्य) | श्री. संतोष तिवारी |
| सौ. पुनम डोंगरे (ग्रा.पं. सदस्य) | श्री. रूपरावजी सवई |
| सौ. प्रतिभा यावले (मुख्याध्यापक) | श्री. चेतन पाथरे |
| श्री. प्रशांत उंडे (विषय शिक्षक) | |

महाविद्यालयीन शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी व गावातील
प्रतिष्ठीत नागरीक व समस्त गावकरी मंडळी

**सशक्त भारतासाठी सशक्त युवक**

टिप : सुकळी (रसुलापूर) हे गाव पूर्वेस अमरावती पासून ७ कि.मी. अंतरावर आहे.

# दैनंदिन कार्यक्रम

## शनिवार दि. ०४/०१/२०२०

दुपारी २. वा. : दत्तकग्राम येथे आगमन, परिसर स्वच्छता व नोंदणी
संध्या ५. वा. : ग्रामस्थांशी चर्चा,प्रकल्प निश्चिती व गट निर्मिती

## रविवार दि. ०५/०१/२०२०

सकाळी ६. वा. : प्रार्थना व योगासने
११.०० वा. : **उद्घाटन समारंभ**
अध्यक्ष : मा. डॉ. स्मिता देशमुख (प्राचार्य, श्री. शिवाजी कला व वाणिज्य महा.अम.)
उद्घाटक : मा.डॉ. मुरलीधर चांदेकर ( कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती,विद्यापीठ,अम.)
प्रमुख अतिथी : मा. दिलीपबाबु इंगोले (कोषाध्यक्ष,श्री. शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती )
मा. डॉ. राजेश बुरंगे (संचालक,रा.से.यो. संत गाडगेबाबा अम.विद्यापीठ)
प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे (क्षेत्रीय समन्वयक रा.से.यो.)
प्रमुख उपस्थिती : मा. सौ. जयश्री प्रमोद निर्मळ (सरपंच)
मा. श्री. प्रमोद पाथरे (पोलीस पाटील)
मा. श्री. मनोज देशमुख (ग्रामसेवक)
मा. सौ.प्रतिभा यावले (मुख्याध्यापक, जि.प.शाळा,सुकळी)
मा. श्री. प्रशांत उंडे (विषय शिक्षक)
दुपारी ३.३० ते ५.वा बौध्दीक सत्र - विषय : **प्रसन्नता व ताण-तणावातून मूक्ती**
प्रमुख वक्ते : प्रा. डॉ.स्वप्नील अरसड (श्री शिवाजी विज्ञान महा. अमरावती)
अध्यक्ष : मा. श्री. प्रा. डॉ. किशोर साबळे
उपस्थिती : डॉ. उमेश कडु , डॉ. नितीन चांगोले, श्री प्रशांत उंडे सर ,
श्री. राजू विरूळकर सर, श्री.अनंत जगताप सर
६.०० ते ७.०० : प्रार्थना व स्फूर्तीगीत
रात्री ८.०० वा. : सांस्कृतीक कार्यक्रम :-
सादरकर्ते : गावकरी भजन मंडळी व किर्तन - किर्तनकार- कु. जान्हवी राऊत,बी.ए. १

## सोमवार दि. ०६/०१/२०२०

सकाळी ६. वा. : प्रार्थना व योगासने (प्रा.विश्वास जाधव)
८.३० ते १२.०० श्रमदान (प्रकल्प कार्य)
दुपारी ३. ते ५. : बौध्दीक सत्र - विषय : **राष्ट्रीय एकात्मेत युवकांची भूमिका**
वक्ते : मा. श्री. अर्जून ठोसरे (पोलीस निरीक्षक,खोलापुरी गेट,अमरावती)
अध्यक्ष : प्रा. डॉ. किशोर फुले,
उपस्थिती : डॉ. बबन झरे, डॉ. सुजाता सबाने, डॉ. अर्चना बोबडे, डॉ. संगिता भुयार,
डॉ. मनोज जोशी, श्री प्रशांत उंडे सर,श्री.राजू अंबाडकर,श्री.प्रफुल्ल घवळे
५.३० ते ६.३० - प्रार्थना व स्फूर्तीगीत
रात्री. ८.०० वा. : सांस्कृतीक कार्यक्रम : झनकार पंचरंगी सादरकर्ते : रियाजउद्दिन पटेल,अम.

**स्वच्छते कडून समृध्दीकडे**

## मंगळवार दि. ०७/०१/२०२०

सकाळी ६.०० वा. प्रार्थना व योगासने ८.३० ते १२.०० वा श्रमदान (प्रकल्प कार्य)
दुपारी ३. ते ५. बौध्दीक सत्र - विषय : **राष्ट्रसंताचे विचार व आजचा युवक**
वक्ते : प्रा. निलेश मोहोकार (ग्रामगिताचार्य,धामणगाव रेल्वे)
अध्यक्ष : डॉ. मनोज जगताप
उपस्थिती : प्रा. डॉ. जयराम गायकवाड, प्रा.डॉ. उमेश कडू,डॉ.गजानन भारती,
श्री. भाष्कर वालसिंगे, श्री. अमोल देशमुख,
सायं ६.०० ते ७.०० प्रार्थना व स्फूर्तीगीत
सायं : ८.०० वा : ,सांस्कृतीक कार्य : मनोरंजनातून समाजप्रबोधन
सादरकर्ते : मा. श्री. विद्याराज कोरे,दुर्गवाडा ता. मोर्शी

## बुधवार दि. ०८/०१/२०२०

सकाळी ६.०० प्रार्थना व योगासने - प्रा. विश्वास जाधव
८. ते १०. : श्रमदिंडी व प्रभातफेरी १० ते १२ : श्रमदान प्रकल्प कार्य
१२ ते ३ : **आरोग्य तपासणी शिबिर** (जिल्हा सामान्य रूग्णालय,तज्ञ डॉक्टर चमू )
दुपारी ३.३० ते ५ बौध्दीक सत्र - विषय : **व्यक्तीमत्व विकास व स्पर्धा परीक्षा**
वक्ते : डॉ. राजेश मिरगे,डॉ. के.के. मोहाडीकर,डॉ.योगेश इंगळे
अध्यक्ष : प्रा. डॉ. महेन्द्र मेटे
उपस्थिती : डॉ. कुमार बोबडे, डॉ. मनोज जोशी, प्रा. रूपेश फसाटे प्रा. प्रतिक करंडे
सायं ६.०० ते ७.०० प्रार्थना व स्फूर्तीगीत
रात्री : ८.०० वा. शालेय विद्यार्थ्यांचे व रा.से.यो. स्वयंसेवकाचे सांस्कृतीक कार्यक्रम

## गुरूवार दि. ०९/०१/२०२०

सकाळी ६. वा. : प्रार्थना व योगासने ८.३० ते १२. : श्रमदान (प्रकल्प कार्य)
दुपारी ३. ते ५. : बौध्दीक सत्र विषय : **लिंगभाव संवेदनशीलता**
वक्त्या : प्रा. डॉ. निशा शेंडे ,स्त्रीवादी अभ्यासिका,महिला महाविद्यालय,अमरावती
अध्यक्ष : प्रा. डॉ. सुजाता सबाने
उपस्थिती : डॉ. वर्षा चिखले,डॉ. अर्चना बोबडे, डॉ. वैशाली देशमुख, डॉ. वंदना देशमुख,
डॉ. संगिता भुयार, डॉ. वैशाली टाकोडे, डॉ.अपर्णा सरोदे,
सायं ६.०० ते ७.०० प्रार्थना व स्फूर्तीगीत
साय ८.०० वा. संगित रजनी कार्यक्रम - सादरकर्ते : प्रा. गजानन केतकर (संगित विभाग)

## शुक्रवार दि. १०/०१/ २०२०

सकाळी ६. वा. : प्रार्थना व योगासने ८.३० ते १२ : श्रमदान (प्रकल्प कार्य)
दुपारी २ ते ३ वा. सदिच्छा भेट -रा.से.यो.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन - मा.प्राचार्य श्री.केशवराव गावंडे
(अध्यक्ष,रा.से.यो.समिती तथा कार्यकारणी सदस्य श्री.शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती)
३.०० ते ५.०० : बौध्दीक सत्र विषय : **लोकोत्तर संत गाडगेबाबा**
वक्ते : प्रा. डॉ. संदिप राऊत (उत्कृष्ठ रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त )
अध्यक्ष : प्रा. डॉ. किशोर साबळे
उपस्थिती : डॉ. नितीन चांगोले, प्रा. डॉ. जयराम गायकवाड, डॉ. गजानन भारती,
श्री. भाष्कर वालसिंगे, श्री.मोहन मोरे, श्री. धनंजय साळुंखे
सायं ६.०० ते ७.०० प्रार्थना व स्फूर्तीगीत
८.०० वा रा.से.यो. स्वयंकाचे सांस्कृतीक कार्यक्रम

**बेटी बचाओ, बेटी पढाओ**

# श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष शिबिर अहवाल

## दत्तक ग्राम - सुकळी, रसुलापूर

## जि. अमरावती

## दि. ०४/०१/२०२० ते दि. ११/०१/२०२०

## सन २०१९-२०

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर शनिवार दि. ४ जानेवारी २०२० ते ११ जानेवारी २०२० या कालावधीत दत्तकग्राम सुकळी, रसुलापूर, जि. अमरावती येथे संपन्न झाले. या शिबीरामध्ये विविध बौद्धिक, सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात आले.

दि. ४ जानेवारी रोजी दत्तकग्राम सुकळी, रसलुपूर येथे आगमन करून परिसर स्वच्छता व ग्रामस्थांची चर्चा करून प्रकल्प निश्चिती करण्यात आला.

दि. ५ जानेवारी रोजी सकाळी योगासने प्रार्थना आटोपल्यानंतर प्रकल्प कार्य करण्यात आले आणि दुपारी ११.०० वाजता उद्घाटन समारंभ पार पडला, उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. स्मिता देशमुख प्राचार्य श्री शिवाजी महाविद्यालय अमरावती, उद्घाटक डॉ. राजेश बुरंगे, प्र. संचालक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती तसेच प्रमुख उपस्थिती सौ. जयश्री प्रमोद निर्मळ सरपंच, प्रमोद पाथरे पोलीस पाटील, मनोज देशमुख ग्रामसेवक तसेच जिल्हा परिषद शाळा सुकळी येथील मुख्याध्यापक सौ. प्रतिभा यावले, विषय शिक्षक मा. प्रशांत उंडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. डी.एस. नामुर्ते, क्षेत्रिय समन्वयक व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा गाडगे, सल्लागार समिती सदस्य डॉ. जयराम गायकवाड तसेच डॉ. अपंर्ना सरोदे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटकीय कार्यक्रम संपन्न झाला. दुपारी बौद्धिक सत्राला व्याख्याते म्हणून डॉ. स्वप्नील अरसड यांनी **"प्रसन्नता व ताण-तणावातून मुक्ती"** या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्ष म्हणून डॉ. किशोर साबळे लाभले तसेच डॉ. नितीन चांगोले, डॉ. उमेश कडू यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळी प्रार्थना व नंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. रा.से.यो. स्वयंसेवक कु. जान्हवी राऊत या विद्यार्थीनीने कीर्तन सादर केले. गावकरी भजनी मंडळ व गावकऱ्यांचा भरगोस प्रतिसाद लाभला डॉ. चिखले मॅडम यांनी मौलिक मार्गदर्शन व कौतुक केले.

दि. ६ जानेवारी सोमवार रोजी प्रा. विश्वास जाधव यांनी प्राणायन व योगासनाचा वर्ग घेतला. त्यानंतर प्रार्थना झाली व प्रत्यक्ष प्रकल्प कार्याला सुरुवात झाली. दुपारी बौद्धिक सत्राकरिता मा. श्री. अर्जुन ठोसरे (पोलीस निरीक्षक, खोलापूरी गेट, अमरावती) यांनी **"राष्ट्रीय एकात्मतेत युवकांची भूमिका"** या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे डॉ. किशोर फुले, प्रमुख पाहुणे डॉ. बबन झरे व मा. श्री. प्रशांत उंडे होते. सायंकाळी प्रार्थना व रात्री झनकार पंचरंगी रियाजद्दिन पटेल यांनी मनोरंजनपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. याप्रसंगी डॉ. अर्चना बोबडे यांनी मार्गदर्शन केले.

दि. ७ जानेवारी मंगलवार रोजी सकाळी प्रा. विश्वास जाधव व श्री देशमुख यांनी योगासन व प्राणायाम घेतले. प्रार्थना आटोपल्यानंतर रा.से.यो. स्वयंसेवकांनी प्रकल्प कार्य केले. दुपारी बौद्धिक सत्राकरिता प्रा. निलेश मोहोकार (ग्रामगीताचार्य, धामणगाव रेल्वे) यांचे **"राष्ट्रसंतांचे विचार व आजचा युवक"** या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. अध्यक्षस्थानी डॉ. मनोज जगताप होते. डॉ. गजानन भारती, डॉ. वैशाली टाकोडे, डॉ. गायकवाड, डॉ. मनोज जोशी प्रमुख पाहुणे म्हणून होते. सायंकाळी प्रार्थना व रात्री श्री. विद्याराज कोरे, दुर्गवाडा यांचे संत गाडगे बाबाच्या वेशभूषेत मनोरंजनातून समाजप्रबोधन केले. रा.से.यो. स्वयंसेवक व ग्रामस्थांनी कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

दि. ८ जानेवारी बुधवार रोजी प्रा. विश्वास जाधव यांनी योग व प्राणायाम प्रार्थना आटोपल्यानंतर सुकळी गावातून श्रमदिंडी व प्रभातफेरी काढण्यात आली, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रेरक घोषणा व सामाजिक विषयावरील स्त्रीभ्रूण हत्या, शेतकरी आत्महत्या, हुंडाबळी, पाणी अडवा पाणी जिरवा, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा, पर्यावरण जागृती इ. विषयावरील पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. तसेच वारकरी दिंडीतून विठ्ठलनामाच्या जयघोषाने अवघे गाव दुमदुमले. प्रकल्प कार्यानंतर आरोग्य तपासणी शिबीर जिल्हा सामान्य रूग्णालयातील तज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आली. बौद्धिक सत्रामध्ये डॉ. योगेश इंगळे यांनी **"व्यक्तिमत्व विकास व स्पर्धा परीक्षा"** विषयावर प्रमुख मार्गदर्शन केले. डॉ. महेंद्र मेढे, प्रा. रूपेश फसाटे यांनी विचार व्यक्त केले.

दि. ९ जानेवारी गुरुवात रोजी सकाळी प्राणायाम योगासने व प्रार्थना आटोपल्यानंतर शोषखड्डे हे प्रकल्पंकार्य करण्यात आले. दुपारी बौद्धिक सत्रातील **"लिंगभाव संवेदनशीलता"** या विषयावर डॉ. भगवा फाडके यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. डॉ. वंदना देशमुख यांनी अध्यक्ष म्हणून विशेष मार्गदर्शन केले. रात्री सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील संगीत विभागाद्वारे संगीत रजनी कार्यक्रम प्रा. गजानन केतकर व विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर तसेच चित्रपट गीतातून गावकऱ्यांचे मनोरंजन झाले.

दि. १० जानेवारी शुक्रवार रोजी सकाळी प्रार्थना, प्राणायाम व योगासने नंतर प्रकल्प कार्य पूर्ण करण्यात आले. दुपारच्या बौद्धिक सत्राकरिता प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संदीप राऊत उत्कृष्ट रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त यांनी **"लोकोत्तर संत गाडगे बाबा"** या विषयावर मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थितीत डॉ. देशमुख मॅडम असून अध्यक्ष स्थान डॉ. संगीत भूयार यांनी स्वीकारले तथा गाडगे बाबाच्या जीवनावर मार्गदर्शन केले. सायंकाळी प्राथनेनंतर रात्री विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

दि. ११ शनिवार रोजी पहाटे प्राणायाम योगासने व प्रार्थना नंतर ग्रामस्वच्छता करून प्रकल्प कार्य पूर्ण करण्यात आले. दुपारी समारोपीय कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. स्मिता देशमुख प्राचार्य लाभल्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून शिबीराचा आढावा घेतला. प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. रमेश अंधारे सर यांनी ग्रामीण जगण्यातील जाणीवांनी जीवन समृद्ध होते व शिबीरातून व्यक्तिमत्व विकास साधल्या जातो असे विचार व्यक्त केले. समारोपीय कार्यक्रम सरपंच सौ. जयश्री प्रमोद निर्मळ यांनी मार्गदर्शन केले.

तसेच डॉ. सुभाष गावंडे अधिसभा सदस्य संत गा.बा.वि. यांनी क्रीडा व युवकांची भूमिका यावर मार्गदर्शन केले तसेच डॉ. राजेश बुरंगे प्र. संचालक संत गा.बा.वि. अमरावती यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला श्री. प्रमोद पाथरे, प्रतिभा यावले, मनोज देशमुख, डॉ. जयराम गायकवाड, डॉ. अपर्णा सरोदे, डॉ. बबन झरे इ. मान्यवर उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. सुवर्णा गाडगे यांनी करताना दि. ४ तारखेपासून सुरू असलेल्या शिबीराचा अहवाल सादर केला तसेच आभार कार्यक्रम अधिकारी डॉ. नामुर्ते सर यांनी केले व संचालन कु. जान्हवी राऊत हीने केले.

दि. ४ जानेवारी पासून ते ११ जानेवारी पर्यंत शिबीरादरम्यान रोज प्रार्थना, योगासने, प्राणायाम सकाळी ६ वाजता घेण्यात आले. प्रकल्पकार्य, शोषखड्डे ग्राम सुकळी व रसुलापूर येथे करण्यात आले. सुकळी व रसुलापूर येथे ग्रा.पं. च्या निर्देशानुसार १० कुटुंबांना शौचखड्डे तयार करून दिले. ग्रामस्वच्छता, प्लॅस्टिक निर्मूलन, रस्त्यावरील झाडांना पाणी देणे, परिसर स्वच्छता, पाणी अडवा पाणी जिरवा यासाठी कार्य करण्यात आले तसेच विविध विषयावरील व्याख्यानांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास, व्यक्तिमत्व विकास साधण्यात आला.

रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
डॉ. डी.एस. नामुर्ते

प्राचार्य
डॉ. स्मिता आर. देशमुख

## श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती
## राष्ट्रीय सेवा योजना
## विशेष शिबिर
## दि. ४ जानेवारी २०२० ते ११ जानेवारी २०२०
## विशेष प्रकल्प अहवाल

---

**एक दृष्टिक्षेप -**

### शौचालय खड्डे प्रकल्प

दि. ४/०१/२०२० ते ११/०१/२०२० या कालावधीमध्ये सुकळी, रसुलापूर येथे श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर संपन्न झाले. या शिबिरास्थळी दैनंदिन कार्याव्यतिरिक्त श्रमदान घेण्यात आले. या श्रमदानात रासेयो युनिटचे १०० स्वयंसेवक व गावातील काही लोकांच्या सहकार्यातून व श्रमदानातून शौचालय खड्डे प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली.

भारत सरकारच्या **'हगनदारी मुक्त गाव'** या योजनेच्या अनुषंगाने हा प्रकल्प रा.से.यो. शिबिरात अंमलात आणण्यात आला. कारण ग्रामीण भारतात अजुनही बहुतेक कुटुंब उघड्यावर शौचास बाहेर जातात. त्यात पुरुष, स्त्रिया, मुले दिवसा व रात्रीला बाहेर पडतात. तेव्हा अनेक प्रकारच्या अनुचित घटना घडून येतात. जर अंधाऱ्या रात्री शौचास बाहेर पडल्यानंतर साप, विंचू चावून मृत्यूमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या भारतात भरपूर आहे. याशिवाय उघड्यावर शौच केल्यास अनेक विषाणू हवेतून शरीरामध्ये प्रवेश करतात. त्याचा परिणाम आरोग्यावर होतो. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन व भारत सरकारने **'हगनदारी मुक्त गाव'** ही योजना लक्षात घेऊन रा.से.यो. स्वयंसेवकांनी दि. ५ जानेवारीपासून ते ११ जानेवारीपर्यंत ग्रामपंचायतीने दिर्शानिर्देशीत केलेल्या यादीनुसार एकूण १० कुटुंबांमध्ये शौचालय खड्ड्याची निर्मिती केली होती. त्यामुळे सुकळी या गावात आनंदीमय वातावरण

निर्मितीत रा.से.यो. स्वयंसेवकांनी भर घातली. व रा.से.यो. स्वयंसेवकांनी हगनदारी मुक्त गाव या विषयी जनजागृती रॅली काढून समाजप्रबोधन केले आहे. हा प्रकल्प गावात मा. सौ. जयश्री प्रमोद निर्मळ (सरपंच), पोलीस पाटील श्री. प्रमोद पाथरे, ग्रामसेवक श्री. मनोज देशमुख यांच्या मार्गदर्शनानुसार राबविण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, प्रा. डॉ. राजेश बुरंगे (प्र. संचालक, रा.से.यो. विभाग सं.बा.अ.वि. अमरावती) यांच्या मार्गदर्शनाखाली रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. डी. एस. नामुर्ते व प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे (महिला कार्यक्रम अधिकारी) यांनी हा प्रकल्प पुर्णत्वास नेण्यास महत्त्वाची कामगिरी बजावली.

अशा प्रकारे राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून गावकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून व आरोग्याच्या दृष्टिकोनातून हा प्रकल्प राबविण्यात आला.

Principal
Shri Shivaji Arts and Commerce
College, Amravati

# शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराअंतर्गत विविध उपक्रम

## सुकळी रसुलापूरच्या गावकऱ्यांना मनोरंजनासह समाज प्रबोधनाची मेजवानी



**अमरावती प्रतिनिधी-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर ४ ते ११ जानेवारी या दरम्यान सुकळी रसुलापुर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराअंतर्गत विविध उपक्रमामुळे गावकऱ्यांना समाजप्रबोधन, ज्ञान व मनोरंजनाची मेजवानी मिळत आहे.

प्रा.डॉ. स्मिता देशमुख यांचे मार्गदर्शनासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. डि.एम. नागपुरे आणि महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा गाडगे यांच्या नेतृत्वामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी दररोज विविध उपक्रम राबवित आहे. श्रमदान, स्वच्छ भारत अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन व जनजागृती, पर्यावरण जनजागृती, आरोग्य शिबिर, महिला सक्षमीकरण, व्यक्तिमत्व विकास, ग्राम स्वच्छता अभियान इत्यादी [illegible] येथे कार्यक्रम राबवित आहे. शिबिराला आतापर्यंत अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या असून दररोज बौद्धिक सत्र, सर्वधर्म [illegible] व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून सुकळी गावाचा सर्वांगिण विकास साधला जात आहे. शुक्रवार १० जानेवारी रोजी डॉ. संदिप राऊत यांचे लोकांना संत गाडगेबाबा यांच्या जिवन कार्यावर व्याख्यान होणार असून शनिवार ११ जानेवारी रोजी प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांचे अध्यक्षतेखाली शिबिराचा समारोप होईल. या कार्यक्रमाला सिनेट सदस्य डॉ. सुभाष गावंडे, माजी प्राचार्य रमेश अंधारे, सरपंच सौ. [illegible] निर्मळ, पोलीस पाटील प्रमोद पारे, मनोज देशमुख, प्रतिभा वावरे यांची उपस्थिती राहील. विद्यार्थ्यांनी श्रम दत्तक सुकळी गावांमध्ये शिबिराच्या माध्यमातून केलेले कार्य गावकऱ्यांसाठी लाख मोलाचे ठरले आहे. शिवाजी महाविद्यालयाच्या शिबिरामुळे सुकळी रसुलापूरच्या विकासात [illegible] शिबिराला भेट देणाऱ्या गावकऱ्यांनी काढले आहे. शिबिराअंतर्गत समाजप्रबोधन जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, साक्षरता, स्वच्छता, व्यसनमुक्ती, स्त्री भ्रुण हत्या, शेतकरी आत्महत्या इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्याला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिराच्या माध्यमातून होत असलेले समाज प्रबोधन गावकऱ्यांसाठी पर्वणी ठरले आहे.



# श्री शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयो शिबीराचा समारोप




**अमरावती-** श्री शिवाजी महाविद्यालय अमरावतीच्यावतीने दत्तक ग्राम सुकळी येथे आयोजित रासेयो शिबीराचा समारोप नुकताच करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.स्मिता देशमुख होत्या.त्यांनी आपल्या मनोगतात स्वयंसेवक घडविण्याचे व्यासपीठ म्हणजे एनएसएस असल्याचे प्रतिपादीत केले.व्याख्याते डॉ.रमेश अंधारे यांनी ग्रामिण जीवन माणूस समृद्ध करणारे आहे.साहित्य व समाज घडविण्यासाठी ग्रामिण जगण्यातील जाणीवा निर्माण करणे गरजेचे असल्याचे सांगितले. डॉ.सुभाष गावंडे यांनी क्रीडा व विद्यार्थी यांची सांगड घालित व्यक्तीमत्व विकासावर मार्गदर्शन केले.डॉ.राजेश सुरंगे,सुकळीचे सरपंच जयश्री निर्मळ यांनीही मनोगत व्यक्त केलीत. प्रास्ताविक डॉ.सुवर्णा गाडगे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.ज्ञानेश्वर नामुर्ते यांनी केले.समारोपीय कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.गायकवाड,डॉ.सरोदे, डॉ.झरे, डॉ.जगताप यांच्यासह सुकळीचे ग्रा.पं.सदस्या तथा गावकरी उपस्थित होते.

# रा.से.यो. विशेष शिबिरातील उद्घाटन कार्यक्रम














# रा.से.यो. विशेष शिबिरातील योगा व प्राणायन











# रा.से.यो. विशेष शिबिरातील प्रकल्पावरील श्रमदान














# रा.से.यो. विशेष शिबिरातील प्रकल्पावरील श्रमदान













# रा.से.यो. विशेष शिबिरातील प्रकल्पावरील श्रमदान









# रा.से.यो. विशेष शिबिरातील बौद्धिक सत्र

















# रा.से.यो. विशेष शिबिरातील बौद्धिक सत्र

















# रा.से.यो. विशेष शिबिरातील बौद्धिक सत्र


















# रा.से.यो. विशेष शिबिरातील सांस्कृतिक कार्यक्रम













# रा.से.यो. विशेष शिबिरातील सांस्कृतिक कार्यक्रम











